असा. क्र. ९७ रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, नोव्हेंबर २७, १९९६/अग्रहायण ६, शके १९१८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल मध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ नोव्हेंबर १९९६

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसआरव्ही. १४९४/प्र.क्र. ८६३/(१)/ई-७.---भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि या संबंधात करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश आणि विलेख यांचे अधिक्रमण करून ,महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या नियंत्रणाखालील (गट "क") मधील अव्वल कारकून पदांवरील सेवा प्रवेशाचे नियमन करणारे पुढील नियम करीत आहेत ते असे :---

१. (एक) या नियमांस महाराष्ट्र महसूल विभाग अव्वल कारकून (सेवाप्रवेश) नियम, १९९६ असे म्हणता येईल.

(दोन) ते नियम १५ ऑक्टोबर, १९९४ पासून अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,--

(अ) " अव्वल कारकून " यामध्ये कोषागार अव्वल कारकून, उप चिटणीस, धिकाऱ्यांचे दुसरे लिपिक, शिरस्तेदार, प्रथम श्रेणी लिपिक व वरिष्ठ लिपिक समावेश होतो;

(ब) " जिल्हाधिकारी " म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६ कलम ७ अन्वये नियुक्त करण्यात आलेला एखाद्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी ;

(क) " प्रथम श्रेणी लिपिक " म्हणजे नागपूर विभाग व अमरावती विभाग प्रथम श्रेणी लिपिकाचे पद धारण करणारा ;

(ड) " वरिष्ठ लिपिक " म्हणजे जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्याल वरिष्ठ लिपिकाचे पद धारण करणारा ;

(इ) " अर्हताप्राप्त व्यक्ती " म्हणजे महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेली ती परीक्षा उत्तीण होण्यापासून सूट मिळालेली व्यक्ती ;

(फ) " महसूल अर्हता परीक्षा " म्हणजे लिपिक-टंकलेखक संवर्गामधून अव्वल संवर्गामध्ये कोणत्याही व्यक्तीस पदोन्नती देण्यासाठी विहीत केलेली परीक्षा अथव उद्देशासाठी शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात येईल अशी अन्य कोणतीही प

३. अव्वल कारकून पदांवरील नियुक्ती पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारे म्हण

(अ) लिपिक टंकलेखक हे पद धारण करणाऱ्या व त्या संवर्गामध्ये तीन कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून पात्रतेनुसार, ज्येष्ठता आधारे योग्य व अर्हताप्राप्त व्यक्तीला पदोन्नती देऊन, किंवा

(ब) कार्यकारी आदेशांद्वारे शासनाकडून विहीत करण्यात येईल तितक्या मय मंडल अधिकाऱ्यांची पदे धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या बदलीद्वारे, करण्यात

४. अव्वल कारकून हा संवर्ग जिल्हा स्तरीय संवर्ग असेल.

५. प्रत्येक जिल्ह्यातील अव्वल कारकून संवर्गातील पदांच्या संबंधात जिल्हाधिक नियुक्ती प्राधिकारी असेल.

६. खंड-१ (दोन) च्या तरतुदी काहीही असल्या तरी, शासकीय अधिसूचना आरसीटी. १०८०/प्र.क्र. ३६६/ई-७, दिनांक १८ फेब्रुवारी १९८६ अन्वये तयार आलेल्या सेवाप्रवेश नियमांनुसार दिनांक ३१ ऑक्टोबर १९९४ पर्यंत अव्वल कारकून करण्यात आलेल्या नियुक्त्या वैध समजण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व ना

**अजित वर्टी,**

शासनाचे प्रधान सचिव (महसूल)

## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ नोव्हेंबर १९९६

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसआरव्ही. १४९४/प्र.क्र. ८६३/(दोन)/ई-७.––भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि यासंबंधात करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश आणि विलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या नियंत्रणाखालील (गट "क") मधील मंडल अधिकारी पदांवरील सेवा प्रवेशाचे नियमन करणारे पुढील नियम करीत आहेत ते असे :––

१. (एक) या नियमांस, महाराष्ट्र महसूल विभाग मंडल अधिकारी (सेवा प्रवेश) नियम, १९९६ असे संबोधण्यात येईल.

(दोन) ते नियम दिनांक १५ ऑक्टोबर १९९४ पासून अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,––

(अ) "आयोग" म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग;

(ब) "मंडल निरीक्षक" यामध्ये कोकण विभाग, नाशिक विभाग, पुणे विभाग व औरंगाबाद विभाग यांमधील मंडल निरीक्षक हे पद धारण करणारा, त्याचप्रमाणे नागपूर विभाग व अमरावती विभाग यांमध्ये दिनांक १५ ऑक्टोबर १९९४ या दिवशी अथवा त्यापूर्वी महसूल निरीक्षक हे पद धारण करणारा यांचा समावेश होतो;

(क) "मंडल अधिकारी" म्हणजे मंडल अधिकारी हे पद धारण करणारा;

(ड) "जिल्हाधिकारी" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ७ अन्वये नियुक्त करण्यात आलेला जिल्ह्याचा जिल्हाधिकारी;

(इ) "अर्हताप्राप्त व्यक्ती" म्हणजे महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेली अथवा ती परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली व्यक्ती;

(फ) "महसूल अर्हता परीक्षा" म्हणजे मंडल अधिकारी अथवा अव्वल कारकून या पदांवर पदोन्नतीसाठी विहीत केलेली परीक्षा अथवा त्या उद्देशासाठी शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात येईल अशी कोणतीही अन्य परीक्षा;

(ग) "महसूल विभाग" म्हणजे शासनाचा महसूल विभाग;

(ह) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन, आणि

(य) "माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा" म्हणजे महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (सन १९६५ च्या महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस) अन्वये एखाद्या विभागीय मंडळाकडून घेतली जाणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा व यात राज्य शासनाने त्याच्याशी समतुल्य असल्याचे जाहीर केलेल्या अन्य कोणत्याही परीक्षेचा समावेश होतो;

(ज) "तलाठी" म्हणजे तलाठी हे पद धारण करणारी व्यक्ती;

३. मंडल अधिकारी पदांवरील नियुक्ती पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारे, म्हणजेच

(अ) तलाठी हे पद धारण करणाऱ्या व त्या संवर्गामध्ये तीन वर्षांपेक्षा कमी न इतकी नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून पात्रतेनुसार, ज्येष्ठताक्रमाच्या आधारे य व अर्हताप्राप्त व्यक्तीला पदोन्नती देऊन :

तथापि, प्रचलित नियमांनुसार ज्या तलाठ्यांना महसूल अर्हता परीक्षेस बसणे आवश नव्हते, अशा तलाठ्यांचासुद्धा पदोन्नतीसाठी विचार करण्यात येईल, मात्र त्यांनी पदोन्नती तारखेपासून तीन वर्षांत किंवा दिनांक ३१ डिसेंबर १९९९ रोजी अथवा त्यापू यापैकी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपर्यंत महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण व लागेल अथवा त्यांना महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळवावी लागे अथवा

(ब) कार्यकारी आदेशाद्वारे शासनाकडून विहीत करण्यात येईल तितक्या मर्यादेप अव्वल कारकूनाची पदे धारण करणाऱ्या योग्य व्यक्तींच्या बदलीने करण्यांत येईल :

आणखी असे की, ज्या मंडल निरीक्षकास अथवा महसूल निरीक्षकास दिनांक ऑक्टोबर १९९४ पासून श्रेणीवाढ करण्यात आलेल्या मंडल अधिकाऱ्यांच्या पदा सामावून घेण्यात आले आहे, त्याला सुद्धा महसूल अर्हता परीक्षा दिनांक ३१ डिसे १९९९ रोजी अथवा त्यापूर्वी उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(क) जे दिनांक ३१ डिसेंबर १९९९ रोजी अथवा त्यापूर्वी महसूल अर्हता परी उत्तीर्ण होणार नाहीत ते सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत अथवा त्याला अथवा ति सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळेपर्यंत कोणतीही वार्षिक वेतनवाढ मिळण्य हक्कदार राहणार नाहीत.

४. मंडल अधिकारी हा संवर्ग जिल्हास्तरीय संवर्ग असेल.

५. प्रत्येक जिल्ह्यामधील मंडल अधिकाऱ्याच्या संवर्गाच्या संबंधात जिल्हाधिकारी नियुक्ती प्राधिकारी असेल.

६. खंड १ (दोन) च्या तरतुदी काहीही असल्या तरी, शासकीय अधिसूचना, क्रम आरसीटी. १०८०/प्र. क्र. ३६६/ई-७, दिनांक १८ फेब्रुवारी १९८६ अन्वये तयार केलेल सेवा प्रवेश नियमांनुसार दिनांक ३१ ऑक्टोबर १९९४ पर्यंत मंडल अधिकाऱ्यांच्या पदां केलेल्या नियुक्त्या वैध समजण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अजित वर्टी,
शासनाचे प्रधान सचिव (महसूल).